# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७
चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /1243/2019 दिनांक: 12/07/19

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– शारीरीक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक पदांच्या पदभरतीबाबत
संदर्भ :–क्र. उशिसं/मवि–!/पदभरती प्रक्रिया/२०१९/८३९७ दिनांक २५/०६/२०१९.
महोदय

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण संचालनालयाकडुन शारीरीक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक पदांच्या पदभरतीबाबत चे पत्र विद्यापीठाला प्राप्त झालेले असुन सदर पत्र सोबत संलग्नित करण्यात येत आहे. करीता महाविद्यालयाने सोबत संलग्नित पत्राचे अवलोकन करुन नियमानुसार कार्यवाही घ्यावी करीता माहीतीस सादर.

मा. प्र. कुलगुरु यांच्या आदेशान्वये

(डॉ. व्ही.सी. सिलारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :– उपरोक्तप्रमाणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune.in E-Mail : dhepune@noc.com
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.: उशिसं//मवि-१/पदभरती प्रक्रिया /२०१९/८३९८ दिनांक: .६.२०१९

25 JUN 2019

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 18180 दिनांक 26/6/19
जावक क्र.............. दिनांक..........

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय: शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक पदांच्या पदभरतीबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र.:आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/ मशि-५ दि. ३.११.२०१८ अन्वये, दि. १.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणा-या सहायक प्राध्यापकांच्या एकुण रिक्त पदांच्या ४०% पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक या पदांच्या १००% पदभरतीसही मान्यता देण्यात आली आहे.

पदभरतीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचे विविध आरक्षण विषयक निर्णय निर्गमित झाले आहेत. सदर शासन निर्णयातील सूचना व नियमांचे पालन सहायक प्राध्यापक या पदासह शारिरीक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक या पदांच्या भरतीबाबतही होणे अत्यावश्यक आहे.

त्यानूसार अशासकीय अनुदानित महाविद्यालये व संस्थांनी सदर पदे भरताना विहीत बिंदूनामावलीनूसार आरक्षण, संबंधीत विद्यापीठाकडून तसेच सक्षम प्राधिका-याकडून तपासून घ्यावे. आरक्षणविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित महाविद्यालयांना व संस्थांना सूचित करण्यात यावे. महाविद्यालयीन स्तरावरुन आरक्षण विषयक नियमांच्या अंमलबजावणीमध्ये अनियमितता झाल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधीत विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाची राहील.

(हरीभाऊ शिंदे)
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.